**मे. भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लि., दत्तात्रयनगर, पारगाव, तालुका आंबेगाव, जिल्हा- पुणे यांच्या प्रस्तावित साखर युनिटच्या ६००० टीसीडी ते १०००० टीसीडी विस्तारीकरणासाठी दिनांक: शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५, दुपारी १२:०० वाजता, दत्तात्रयनगर, पो. पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे पर्यावरण विषयक सुनावणीचे इतिवृत्त.**

---

संदर्भ:

- भारत सरकार, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक १४ सप्टेंबर २००६ चे अधिसूचना व दिनांक ०१ डिसेंबर २००९ चे सुधारित अधिसूचना
- पर्यावरण मंत्रालयाचे कार्यालयीन स्मरणपत्र, दिनांक १४ सप्टेंबर २०२०
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निर्देश, दिनांक ०७ मे २०२५

मे.भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड यांनी प्रस्तावित केलेल्या साखर युनिटच्या विस्तारीकरणासाठी (६००० टीसीडी वरून १०००० टीसीडी पर्यंत) सार्वजनिक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता कारखान्याच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली.

श्री. संदीप मोटेगावकर, क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-II व सार्वजनिक सुनावणी समितीचे संयोजक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व पर्यावरणीय बाबींवर चर्चा करण्याच्या उद्देशाची माहिती दिली. ही माहिती मा. ज्योती कदम मॅडम, सार्वजनिक सुनावणी समिती अध्यक्ष व निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे यांच्या उपस्थितीत तसेच मा. श्री. नवनाथ अवताडे, समिती सदस्य व उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, यांच्या उपस्थितीत देण्यात आली.

सर्व नागरिक, मान्यवर लोकप्रतिनिधी, स्थानिक गावांचे रहिवासी, पर्यावरण विषयक कार्य करणाऱ्या संस्था व वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. मा. अध्यक्षांच्या अनुमतीने पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणीबाबतचा उद्देश व सविस्तर माहिती सादर करण्यात आली. तसेच संयोजकांनी नमूद केले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक १४ सप्टेंबर २००६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार व दिनांक ०१ डिसेंबर २००९ रोजी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये, आमच्या कार्यालयास भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, पारगाव यांनी प्रस्तावित केलेल्या विद्यमान साखर कारखान्याच्या (६००० टीसीडी वरून १०००० टीसीडी पर्यंत) विस्तारीकरणासंबंधी पर्यावरणीय बाबींवरील सार्वजनिक जनसुनावणीसाठी प्रस्ताव प्राप्त झाला होता. सदर प्रकल्पासाठी पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ज्ञ मूल्यांकन समितीने दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी संदर्भ अटी (Terms of Reference) प्रदान केल्या होत्या.

त्यानुसार, प्रकल्प प्रस्तावकांनी सार्वजनिक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यालय, मुंबई येथे प्रस्ताव सादर केला. मा. सहसंचालक, जल प्रदूषण नियंत्रक विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिनांक ०७ मे २०२५ रोजी पत्राद्वारे या कार्यालयास संबंधित कारखान्याच्या पर्यावरणीय बाबींवरील सार्वजनिक जनसुनावणी आयोजित करण्याचे आदेश दिले.

सदर प्रस्तावानुसार व मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक ११ जून २०२५ चे पत्रानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सार्वजनिक पर्यावरणीय जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता कारखाना स्थळावर आयोजित करण्यात आली. त्यानंतर सुनावणीसंदर्भातील अधिसूचना दिनांक २२ जुलै २०२५ रोजी दै.लोकसत्ता, दै.सकाळ व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रांमध्ये (मराठी व इंग्रजी भाषेत) प्रसिद्ध करण्यात आली होती. या अधिसूचनेद्वारे नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पासंबंधी सूचना, अभिप्राय, टीका व हरकती मौखिक किंवा लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्रकल्पाची सविस्तर माहिती असलेला संक्षिप्त पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) अहवाल नागरिकांच्या अभ्यासासाठी खालील ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला होता. तसेच संबंधित विभागांना नागरिकांकडून लेखी सूचना, टिका टिपण्णी, निवेदने स्वीकारण्यास विनंती करण्यात आली होती.

- मा. जिल्हाधिकारी कार्यालय - पुणे जिल्हा उद्योग केंद्र - पुणे
- जिल्हा परिषद कार्यालय - पुणे
- प्रादेशिक कार्यालय - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
- उप-प्रादेशिक कार्यालय - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-II, जोग सेंटर, वाकडेवाडी
- मा. सदस्य सचिव - महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई
- विभागीय कार्यालय - पश्चिम विभाग, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नागपूर
- पर्यावरण विभाग - नवीन प्रशासकीय इमारत, मॅडम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई
- मा. तहसीलदार - आंबेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे
- मा. तहसीलदार - ता. शिरूर, जि. पुणे
- मा. उपविभागीय अधिकारी - जुन्नर- आंबेगाव - मंचर
- मा. उपविभागीय अधिकारी - पुणे शहर-शिरूर
- ग्रामपंचायत कार्यालये - खडकी, थोरांदळे, रांजणी, नागापूर, वळती, भागडी, शिंगवे, पिंपळगाव तर्फे महाळुंगे, अवसरी खुर्द, वायाळमळा, भराडी, जवळे, निरगुडसर, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, मेंगडेवाडी, पारगाव तर्फे अवसरी बुद्रुक, जारकरवाडी, काठापूर बुद्रुक, देवगाव, लाखनगाव, पोंदेवाडी, पहाडदरा, खडकवाडी, धामणी, रानमाळा, लोणी, वडगावपीर (ता. आंबेगाव, जि. पुणे), काठापूर खुर्द, पिंपरखेड, चांडोह, कवठे, इचकेवाडी, सविंदणे, पाबळ, फुटाणेवाडी, आखिरमळा (ता. शिरूर, जि. पुणे).

सध्यापर्यंत मंडळास सदर प्रकल्पासंदर्भात कोणतीही हरकत, सूचना, टीका किंवा अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत. भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसूचनेनुसार, मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने दिनांक २८ जुलै २०२५ रोजी खालील समितीची गठीत करण्यात आली:

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे. - **अध्यक्ष**
(किंवा त्यांच्या वतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी पदाच्या अधिकाऱ्यापेक्षा कनिष्ठ पदाचा अधिकारी नसावा)

२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे - **सदस्य**
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी)

३. मा. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-II - **संयोजक**

मा. अध्यक्षांच्या मान्यतेनंतर प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. उपस्थित नागरिकांना सदर प्रकल्पासंदर्भात त्यांच्या हरकती, सूचना, अभिप्राय व टीका मौखिक किंवा लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. प्रकल्प प्रस्तावक व तांत्रिक सल्लागार यांनी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत निवेदन सादर केले. आजची सार्वजनिक जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पासंबंधी पर्यावरणीय सूचना, अभिप्राय व हरकती प्राप्त करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती. सदर समितीमार्फत अंतिम मंजुरी देण्यात येत नाही. आजच्या सुनावणीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजी भाषेत तयार करण्यात येईल. यामध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग, छायाचित्रे, लेखी व मौखिक निवेदने तसेच संबंधित कागदपत्रांचा समावेश असेल. हे इतिवृत्त पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्षांच्या अनुमतीने प्रकल्प सल्लागारास प्रकल्प सादर करण्याची विनंती करण्यात आली. पर्यावरण सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याचे सादरीकरण केले. सल्लागारांनी नमूद केले की, प्रकल्प प्रस्तावकांकडून ६००० टीसीडी वरून १०००० टीसीडी पर्यंत विस्तारीकरणासाठी ₹५२ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यासाठी ₹३९ लाखांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

सादरीकरणानंतर पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणी समितीचे सदस्य संयोजक यांनी उपस्थित नागरिकांना आवाहन केले की, सदर प्रकल्पासंदर्भात कोणतीही हरकत, सूचना किंवा अभिप्राय असल्यास ते नोंदवावेत.

**खालील व्यक्तींनी सार्वजनिक जनसुनावणीत सहभाग घेतला, आणि त्यांच्या प्रश्नांना प्रकल्प प्रस्तावक, पर्यावरण सल्लागार व सार्वजनिक सुनावणी समितीने खालीलप्रमाणे उत्तर दिले:**

**१) श्री. पांडुरंग दादाभाऊ वाळुंज - रहिवासी, पोंदेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** नामदार साहेबांच्या दूरदृष्टीमुळे परिसरात ऊस हे मुख्य पीक बनले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या गावांमध्ये आर्थिक विकास झाला असून शेतकरी आता आपल्या मुलांना उच्च शिक्षण देऊ शकत आहेत."कारखान्यातून निघणाऱ्या धुराचे प्रमाण कमी करण्यासाठी कोणते उपाय केले जात आहेत का? जसे की रस्त्यावरील वाहने CNG व EV वापरतात, तसे काही?"

**स्पष्टीकरण:**

पर्यावरण सल्लागारांनी उत्तर दिले की, कारखान्याच्या ८० टीपीएच क्षमतेच्या बॉयलरसाठी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर (ESP) बसविण्यात आले आहे. याची कार्यक्षमता ९९.९९% असून केवळ ०.०१% धूर बाहेर पडतो. उर्वरित दोन बॉयलरसाठी वेट स्क्रबर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे कारखान्याच्या चिमणीमधून धूळ किंवा कण बाहेर जाण्याची शक्यता नाही.

श्री.अवताडे (सदस्य, सार्वजनिक जनसुनावणी समिती) यांनी विचारले की, बॉयलरसाठी CNG किंवा बायोगॅस वापरण्याचा विचार करण्यात येत आहे का?

**स्पष्टीकरण:**

पर्यावरण सल्लागारांनी उत्तर दिले की, सध्या बॉयलरसाठी बगॅसचा वापर केला जात आहे. भविष्यात नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यास कारखाना ते नक्की स्वीकारेल.

**२) श्री. अशोक मल्हारी करंडे - रहिवासी, काठापूर बुद्रुक, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. करंडे यांनी नमूद केले की, कारखाना गेली २५ वर्षे उत्तम प्रकारे कार्यरत आहे. स्थानिक रहिवाशांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. विस्तार झाल्यास अधिक रोजगार निर्मिती होईल. कारखान्याने शाळा व महाविद्यालय सुरू केले असून पर्यावरण संरक्षणासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे.

**३) श्री. नितीन ढोबळे, ग्रामपंचायत सदस्य, रहिवासी पारगाव शिंगवे, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. ढोबळे यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीकडे नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत की डिस्टिलरीमुळे बोअरवेलचे पाणी लालसर होत आहे. हे पाणी जनावरांना पिण्यास अयोग्य आहे आणि शेतीसाठीही अडचणी निर्माण करत आहे. कारखान्याला ठोस उपाययोजना करण्याची विनंती करण्यात आली आहे.

**स्पष्टीकरण:**

प्रकल्प प्रस्तावकांचे व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केले की, आजची सार्वजनिक जनसुनावणी ही साखर कारखान्याच्या ६००० टीसीडी वरून १०००० टीसीडी पर्यंत विस्तारीकरणासंदर्भात आहे. ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या डिस्टिलरीच्या स्पेंट वॉशविषयक प्रश्नासंदर्भात, स्पेंट वॉशच्या विल्हेवाटीसाठी स्वतंत्र २२ टीपीएच क्षमतेचा इन्सिनरेशन बॉयलर बसविण्यात आला आहे. डिस्टिलरीमधील स्पेंट वॉश बगॅससह बॉयलरमध्ये जाळण्यात येतो.

**अतिरिक्त निर्देश, मा. नवनाथ अवताडे, सदस्य, सार्वजनिक सुनावणी समिती:**

मा. अवताडे यांनी ग्रामपंचायतीला सूचित केले की, सदर तक्रारी औपचारिक स्वरूपात प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर कराव्यात. त्यांनी नमूद केले की, MPCB मार्फत स्वतंत्र तपासणी करण्यात येईल आणि कारखान्यास आवश्यक निर्देश दिले जातील.

**४) श्री. किरण शांताराम ढोबळे, रहिवासी, पारगाव शिंगवे, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. ढोबळे, स्थानिक ग्रामस्थ यांनी खालील समस्या मांडल्या:

१. कारखाना सन २००० मध्ये सुरू झाला, प्रारंभी कोणतीही अडचण नव्हती. मात्र आता परिणाम दिसू लागले आहेत.
२. मागील वर्षी डिस्टिलरीमुळे पाण्याचे प्रदूषण झाल्याची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आली होती, परंतु त्याकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. ग्रामस्थांनी अशा तक्रारी कुठे सादर कराव्यात?
३. मागील वर्षी १५ ते २० बोअरवेल्समध्ये रसायनयुक्त पाणी आढळले. कारखान्याला याबाबत माहिती देण्यात आली, परंतु केवळ तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या; समस्या अद्यापही सुटलेली नाही.

४. वेट स्क्रबर योग्य प्रकारे कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी कारखान्याची आहे. बॉयलरची राख निवासी भागाजवळ साठवली जाते व चक्री वाऱ्यामुळे ती उडून नागरिकांना त्रास होतो.

५. दूषित पाण्यामुळे जनावरांना व नागरिकांना आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत.

६. प्रदूषण शून्य टक्के नाही–त्याचा परिणाम प्रत्यक्ष जाणवतो.

७. कारखाना इतर गावांना अधिक निधी व सुविधा पुरवतो, परंतु ज्या गावात तो स्थित आहे त्या गावासाठी आरोग्यविषयक समस्या कमी करण्यासाठी ठोस पावले उचललेली नाहीत.

८. कारखान्याने स्थापन केलेल्या शाळेत स्थानिक मुलांसाठी शैक्षणिक शुल्कात कोणतीही सवलत दिली जात नाही. स्थानिकांना याचा लाभ मिळायला हवा.

९. राज्य व राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवणे निश्चितच कौतुकास्पद आहे, परंतु तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी प्रदूषण नियंत्रण उपाययोजना राबवाव्यात.

**स्पष्टीकरण:**

मा. नवनाथ अवताडे, सदस्य, सार्वजनिक जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की, ग्रामस्थांनी मांडलेल्या मागण्या योग्य व वैध आहेत. यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीचा आढावा घेतला जाईल. जर समस्या कायम राहिल्या, तर ग्रामपंचायतीमार्फत नव्याने तक्रार सादर करावी. आजच्या सुनावणीत मांडलेल्या सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात येईल. ग्रामस्थांच्या मागणीनुसार कारखान्याला कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले जातील. तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्वतंत्र तपासणी करण्यात येईल, परिसरातील पाण्याचे नमुने तपासले जातील आणि कारखान्याला आरोग्यविषयक समस्या सोडविण्यास व सामाजिक बांधिलकी पूर्ण करण्यास आवश्यक निर्देश दिले जातील.

**५) श्री. समीर सुदाम वाव्हळ, रहिवासी, शिंगवे, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. वाव्हळ यांनी नमूद केले की, कारखान्याचा विस्तार झाल्यास ऊसाची वेगाने तोड करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना कांद्यासारख्या इतर योग्य पिकांचे नियोजन करता येईल. यामुळे शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढेल आणि त्यांना आर्थिक लाभ मिळेल.

**६) श्री. रामदास यशवंत थोरात, रहिवासी, निरगुडसर, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. थोरात यांनी नमूद केले की, मागील ४§५ वर्षांपासून ऊसतोडीला विलंब होत आहे. त्यामुळे मजूर ऊस जाळून तोड करत असून, त्यातून निर्माण होणारी राख ४ ते ५ किलोमीटर परिसरातील गावांमध्ये पसरते व त्यामुळे वायू प्रदूषण होते. कारखान्याचा विस्तार झाल्यास ऊसतोड वेळेवर होईल आणि प्रदूषण कमी होईल.

**७) श्री. अनिल किसन वाळुंज, रहिवासी, पोंदेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. वाळुंज यांनी नमूद केले की, कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय अत्यंत योग्य आहे. सध्या ऊसतोडीसाठी १६§१७ महिने लागतात, परंतु विस्तारीकरणानंतर ती वेळेआधी पूर्ण होईल व शेतकऱ्यांना कांद्यासारखी इतर पिके घेता येतील. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल.

**प्रश्न:**

"विस्ताराच्या प्रक्रियेत कोणती काळजी घेतली जाणार आहे?"

**स्पष्टीकरण:**

पर्यावरण सल्लागारांनी उत्तर दिले की, विद्यमान १३५० घनमीटर/दिवस क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ETP) हा १०००० टीसीडी विस्तारीकरणानंतर निर्माण होणाऱ्या एकूण सांडपाण्यासाठी पुरेसा आहे. विस्तारीकरणानंतर एकूण ११०० घनमीटर/दिवस सांडपाणी निर्माण होईल आणि त्यावर पूर्ण प्रक्रिया केली जाईल. नवीन बॉयलर बसविण्यात येणार नाही. विद्यमान बॉयलरची क्षमता व प्रदूषण नियंत्रण प्रणाली पर्याप्त आहेत. अतिरिक्त बगॅस विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येईल किंवा प्रेसमडसह कंपोस्टिंगसाठी वापरण्यात येईल. सर्व प्रदूषक घटकांचे व्यवस्थापन केले जाईल. दोन हेक्टर क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्याचा प्रस्ताव आहे.

**प्रश्न: मा. नवनाथ अवताडे, सदस्य, सार्वजनिक जनसुनावणी समिती:**

"सध्या किती सांडपाणी निर्माण होते आणि १०००० टीसीडी विस्तारीकरणानंतर त्यात किती वाढ होईल? विद्यमान सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ETP) यासाठी पुरेसा आहे का? कृपया आकडेवारी तपासा. तसेच, १८०० घनमीटर क्षमतेचा Condensate Polishing Unit (CPU) साखर युनिटसाठी आहे की डिस्टिलरीसाठी?"

**स्पष्टीकरण:**

सध्या सांडपाणी निर्मिती ८१७ घनमीटर/दिवस आहे. विस्तारीकरणानंतर हे प्रमाण ११०० घनमीटर/दिवस होईल. हे संपूर्ण सांडपाणी विद्यमान १३५० घनमीटर/दिवस क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामध्ये प्रक्रिया केले जाईल. १८०० घनमीटर क्षमतेचा Condensate Polishing Unit हा साखर युनिटसाठी आहे. डिस्टिलरीसाठी स्वतंत्र CPU व तीन टप्प्यांचा RO प्रकल्प कार्यरत आहे. प्रक्रिया केलेले सांडपाणी कारखान्याच्या वृक्षारोपणासाठी वापरण्यात येते तसेच शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी पुरवले जाते. यासाठी शेतकऱ्यांशी १६० एकर क्षेत्रासाठी द्विपक्षीय करार करण्यात आला आहे. CPU मध्ये प्रक्रिया केलेले अतिरिक्त कंडेन्सेट कारखान्याच्या विविध तांत्रिक वापरासाठी पुन्हा वापरण्यात येते.

समितीच्या माननीय अध्यक्षा महोदयांनी विचारणा केली की, कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी (CER) अंतर्गत प्रस्तावित केलेल्या रुपये ३९ लाखांचा निधी कोणत्या कामांसाठी वापरला जाणार आहे?

यावर प्रकल्प प्रवर्तकांनी स्पष्टीकरण दिले की, सदर निधीचा वापर पुणे जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने, प्रकल्प स्थळाच्या १० कि.मी. परिघातील गावांमध्ये पर्यावरण व्यवस्थापन व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यासाठी करण्यात येईल.

**८) श्री. कैलास रामदास लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य, पारगाव तर्फे अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** सदर कारखान्याने चिचगाई येथील रहिवाशांसाठी रुपये २० लाखांचा खर्च करून घरगुती पाणीपुरवठा पाइपलाईन उभारली आहे. पारगाव गावातील पिण्याच्या पाण्यासाठी ताशी ३००० लिटर क्षमतेचा आर.ओ. प्रकल्प रुपये १० लाख खर्च करून उपलब्ध करून देण्यात आला आहे. बैलगाडा घाटाच्या विकासासाठी देखील रुपये १०

लाख खर्च करण्यात आले आहेत. पारगाव गावातील आर्थिक व्यवहारांमध्ये वाढ झाली असून कारखाना दरवर्षी रुपये ९ ते १० लाख इतका मालमत्ता कर नियमितपणे भरतो, ज्यामुळे गावाच्या विकासास हातभार लागतो.

**९) श्री. विलास लबडे, रहिवासी, जारकरवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** सिंचन सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे ऊस लागवडीचे क्षेत्र विस्तारण्यास मदत झाली असून, शेतकऱ्यांना योग्य दर मिळविणे शक्य झाले आहे. कारखान्याच्या विस्तारीकरणानंतर ऊस वेळेवर गाळप करता येईल. त्यामुळे मी या विस्तारीकरणाला समर्थन देत आहे.

**१०) श्री. दौलतराव लोखंडे, रहिवासी, पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** श्री. लोखंडे यांनी विचारणा केली की या प्रकल्पासाठी एकूण किती पाण्याची आवश्यकता असेल? त्यांनी कारखान्याकडून सातत्याने होत असलेल्या निधी व सहाय्याबाबत समाधान व्यक्त केले. तथापि, जर दूषित पाणी सोडले जात असेल तर त्यासाठी कायमस्वरूपी आणि आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी सूचना केली. तसेच त्यांनी नमूद केले की कारखान्यामुळे स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाला असून गावातील मुलांसाठी शाळा यांसारख्या चांगल्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे येथील नागरिकांचा जीवनमान स्तर उंचावला आहे.

**स्पष्टीकरण:**

कारखान्याकडून स्पष्टीकरण देण्यात आले की, साखर विभागात वापरल्या जाणाऱ्या पाण्यापैकी ७० टक्के पाणी पुन्हा वापरले जाते. फक्त बॉयलर मेकअप आणि प्रयोगशाळेसाठी नदीचे पाणी वापरले जाते. कुकडी सिंचन विभागाशी ०.२८८ दशलक्ष घनमीटर पाण्याचा करार करण्यात आला असून, प्रतिदिन कारखान्यास केवळ ३०९ घनमीटर पाणी आवश्यक आहे.

सार्वजनिक जनसुनावणी समितीचे सदस्य श्री. अवताडे यांनी नमूद केले की, प्रस्तावित १०,००० टीसीडी क्षमतेच्या कार्यान्वयनामुळे निर्माण होणारे सांडपाणी शक्य तितक्या प्रमाणात प्रक्रिया करून पुन्हा वापरले गेले पाहिजे, ज्यामुळे नैसर्गिक जलस्रोत दूषित होणार नाहीत. यासाठी कारखान्याने आवश्यक ती नियंत्रणात्मक उपाययोजना कराव्यात. प्रक्रिया केलेले पाणी प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या मानकांनुसार असावे व ते नियंत्रित सिंचनासाठी वापरले जावे.

प्रकल्प प्रवर्तकांचे व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केले की, सध्या प्रतिदिन ८१७ घनमीटर सांडपाणी निर्माण होते. विस्तारीकरणानंतर ही मात्रा वाढून ११५० घनमीटर प्रतिदिन होईल. हे संपूर्ण सांडपाणी १३५० घनमीटर प्रतिदिन क्षमतेच्या विद्यमान सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पात (Effluent Treatment Plant § ETP) प्रक्रिया केले जाईल. प्रक्रिया केलेले पाणी कारखान्यामधील बगीचासाठी तसेच कृषी सिंचनासाठी वापरले जाईल. अतिरिक्त कंडेन्सेटच्या प्रक्रियेसाठी १८०० घनमीटर क्षमतेची कंडेन्सेट पॉलिशिंग युनिट (Condensate Polishing Unit § CPU) बसविण्यात आली आहे. सर्व अतिरिक्त कंडेन्सेट या युनिटमध्ये प्रक्रिया करून सहउत्पादनातील कूलिंग

टॉवर, यंत्रसामग्री थंड करणे, डिस्टिलरी किण्वन या कार्यांसाठी पुन्हा वापरले जाते आणि उर्वरित पाणी कृषी सिंचनासाठी वापरले जाते.

मागील वर्षी नवीन डिस्टिलरी प्रकल्प कार्यान्वित करताना, डिस्टिलरी टाक्या, गटारे व फरशी यांचे वॉटरप्रूफिंग अपूर्ण राहिल्यामुळे तसेच त्याच काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे विहिरीचे पाणी दूषित झाले होते, हे मान्य करण्यात आले. तथापि, सध्यास्थितीत सर्व वॉटरप्रूफिंगची कामे पूर्ण झाली असून आता कोणतेही सांडपाणी झिरपत (Effluent Percolation) नाही.

**११) श्री. सचिन हिंगे, रहिवासी, अवसरी बु., ता. आंबेगाव, जि. पुणे**

**प्रश्न:** कारखाना स्थापन झाल्यानंतर परिसरातील गावांमध्ये व्यावसायिक उपक्रमांमध्ये वाढ झाली आहे. कारखान्याची क्षमता आणखी वाढविल्यास शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळप करता येईल. त्यामुळे त्यांनी कारखाना विस्तार प्रस्तावास पाठिंबा व्यक्त केला.

सार्वजनिक जनसुनावणी समितीचे सदस्य श्री. अवताडे यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

“भीमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड येथे पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणी आयोजित करण्यात आली. या सुनावणीस नागरिक, मान्यवर जनप्रतिनिधी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, कारखान्याचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक, सर्व विभागप्रमुख तसेच तांत्रिक सल्लागार उपस्थित होते. प्रस्तुतीकरण अतिशय सोप्या व स्पष्ट पद्धतीने करण्यात आले. कारखान्याच्या प्रशासकीय व तांत्रिक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या सर्वसमावेशक सादरीकरणाच्या आधारे सार्वजनिक जनसुनावणी पार पाडण्यात आली. कारखान्याच्या व्यवस्थापनासंदर्भात आमच्याकडून विचारलेल्या प्रश्नांना, कारखान्याच्या बाजूने मांडलेल्या मुद्द्यांना तसेच सूचनांना, आक्षेपांना व टीकांना कारखान्याच्या सल्लागारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सर्व प्रश्नोत्तरांची नोंद करण्यात येईल. माननीय अध्यक्षा महोदयांनी केलेल्या सूचनांचा समावेश इतिवृत्तात करून पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल.

माननीय अध्यक्षा महोदयांच्या वतीने, आजच्या पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणीस उपस्थित राहिलेल्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. ही सुनावणी अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. कारखाना प्रशासनाने दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतो व माननीय अध्यक्षा महोदयांची परवानगी घेऊन आजची सार्वजनिक सुनावणी संपन्न झाल्याची घोषणा करतो.”

सुनावणीचे कामकाज दुपारी १२.०० वा. सुरू होऊन दुपारी ०१.४५ वा. समाप्त झाले.

(नवनाथ अवताडे)
सदस्य
पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणी समिती
उपप्रादेशिक अधिकारी, पुणे, म.प्र.नि. मंडळ, पुणे.

(ज्योती कदम)
अध्यक्षा
आणि, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे
पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती